मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२३। पान १

# जिल्ह्यातील सर्वात मोठ्या मोशी हॉस्पिटलला प्रशासकिय मंजुरी!

## आमदार महेश लांडगे यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ३० लाख नागरिकांच्या आरोग्य सेवे संदर्भातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प मोशी येथील प्रस्तावित ८५० बेडच्या मल्टि स्पेशालिटी हॉस्पिटलच्या खर्चाला महापालिका स्थायी समितीने प्रशासकीय मान्यता दिली. त्यामुळे भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतील आणखी एका प्रकल्पाला गती मिळाली आहे. पिंपरी-चिंचवडमधील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामीण भागातून रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. वाढती लोकसंख्या आणि वायसीएम वरील ताण याचा विचार करुन भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गाव मोशीत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल उभारावे, अशी मागणी आमदार लांडगे यांनी राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाकडे केली होती.

दरम्यान, राज्य सरकारच्या मंजुरीनंतर महापालिका प्रशासनाने निविदा प्रकिया राबवून मे. वॅसकॉन इंजिनिअर्स लिमिटेड या कंपनीला ३४० कोटी ६७ लाख ६३ हजार २७३ रुपयांच्या निविदा स्वीकारली आहे. तसा प्रस्ताव स्थापत्य विभागाने स्थायी समितीकडे सादर केला होता. त्याला प्रशासक तथा आयुक्त शेखर सिह यांनी मान्यता दिली आहे. निविदा प्रक्रियेमध्ये मे. वॅसकॉन इंजिनिअर्स लिमिटेड, मे.



हर्ष कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मे. न्याती इंजिनिअर्स अँड कन्सलटंट प्रा. लि. यांसह अन्य पाच कंपन्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी वरील तीन कंपन्या पात्र ठरल्या होत्या. प्रशासनाने लघुत्तम दर सादर करणाऱ्या मे. वॅसकॉन इंजिनिअर्स लिमिटेडला हॉस्पिटले काम दिले आहे. मोशीतील गट क्रमांक ६४६ मधील गायरान जागेत हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे. सदर रुग्णालय दोन टप्प्यात उभारण्यात येणार आहे. मोशीत एकूण आठ मजली हॉस्टिटल उभारण्यात येणार आहे. त्यामध्ये ओपीडी व जनरल मेडिसिन विभाग असेल. तसेच, कान-नाक-घसा, नेत्र विभाग, सीटी स्कॅन व एमआरआयची सुविधा, रेडिओलॉजी, डे केअर विभाग, सोनोग्राफी, पेडियाट्रिक, सायकॅट्रिक, त्वचारोग, स्त्रीरोग व श्वसन नलिकांचे आजार यासंबंधित ओपीडी असेल. सर्जरी विभाग, भाजलेले रुग्ण, कॅन्सर रुग्ण, डायलिसिस, पॅथॉलॉजी विभाग, रक्तपेढी व १८० आसन क्षमतेचे कॅन्टीन, ऑपरेशन थिएटर व आयसीयू कॉम्प्लेक्स, जनरल मेडिसिन व नेत्र रुग्ण वॉर्ड असेल. पाचवा मजला जनरल सर्जरी, कान-नाक- घसा वॉर्ड, जनरल सर्जरी, कान-नाक- घसा वॉर्ड असेल. बालरोग वॉर्ड, अस्थिरोग, स्त्री रोग, त्वचारोग व मानसिक रुग्णांचे वॉर्ड, २५० क्षमतेचे लेक्चर हॉल, तसेच पुरेशी जागा उपलब्ध असल्यामुळे या ठिकाणी पिपरी- चिंचवड मेडिकल कॉलेज, पॅरामेडिकल कोर्सेस कॉलेज, कॉलेज उभारण्याबाबत महापालिका प्रशासन सकारात्मक आहे.

> **“शहरातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याचा निर्धार आम्ही ‘व्हीजन-२०२०’ अभियानांतर्गत केला होता. त्यानुसार राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात हा प्रकल्प प्रशासकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे रखडला होता. मात्र, महायुती सरकारच्या काळात प्रकल्पाला गती देण्यात आली. मोशीत होणारे ८५० बेडचे हॉस्पिटल जिल्ह्याची आरोग्यवाहिनी म्हणून ओळखले जाईल. प्रशासनाने पुढील प्रक्रिया करुन कामाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# देशी गोवंश संवर्धनाद्वारे सुदृढ आरोग्य प्राप्ती : परांजपे

## शिक्षण प्रसारक मंडळाच्या यमुनानगर येथील शाळेत गोवत्स पूजन उत्साहात

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

हिंदू धर्म संस्कृतीमध्ये गोवंशाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदू धर्मात गाईला गोमाता संबोधून श्रद्धेय मानलेले आहे. देशी गाईच्या संवर्धनातून धनप्राप्ती बरोबरच पंचगव्याच्या उपयोगाव्दारे सुदृढ आरोग्य प्राप्त होते,



असे मत नंद नंदिनी परिवाराचे अजित परांजपे यांनी व्यक्त केले. शिक्षण प्रसारक मंडळाच्या यमुनानगर, निगडी येथील शाळेत रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गोवत्स पूजन उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी परांजपे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी माजी नगरसेविका सुमन पवळे, उत्तम केंजळे, शि. प्र. नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, उपाध्यक्ष गजेंद्र पवार, शि. प्र. मंडळ निगडी शाळा कार्याध्यक्ष ॲड. दामोदर भंडारी, हेमंत बोऱ्हाडे, सल्लागार सुधीर काळकर, मिलिंद देशपांडे, रवी रबडे, गिरीश वायकर, मुख्याध्यापिका ज्योती बक्षी, लिना वर्तक, उमा भोळे, सविता बिराजदार आदी उपस्थित होते. यावेळी शाळेच्या फेसबुक, इन्स्टाग्राम पेज आणि युट्यूब चॅनलचा शुभारंभ करण्यात आला. शक्तिशाली भारताच्या निर्मितीसाठी आणि सुजाण नागरिक तयार करण्यासाठी निगडी शाळा विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्यासाठी नेहमीच अग्रेसर असते.

# आगामी निवडणुकांमध्ये भाजपचा डंका!

## ग्रामपंचायत निवडणुकीचीच पुनरावृत्ती होणार: भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप

**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ग्रामपंचायत निवडणुकीचीच पुनरावृत्ती होईल. भारतीय जनता पार्टीचे सर्वाधिक उमेदवार निवडून येतील आणि भाजपा नंबर- १ होईल, असा विश्वास भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टी शहर कार्यकारिणीची संघटनात्मक आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी राज्यात नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपा सर्वाधिक जागा मिळवून नंबर- १ राहिल्याबद्दल विजेते उमेदवार, पक्षाचे कार्यकर्ते, भाजपा परिवारातील सदस्य यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, पश्चिम महाराष्ट्र समन्वयक योगेश बाचल माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस शितल शिंदे, शैलजा मोळक, संजय मंगोडेकर, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे, चिंचवड विधानसभा प्रमुख काळूराम बारणे आदी उपस्थित होते. राज्यातील नुकतेच २ हजार ३५९ ग्रामपंचायतींची निवडणूक झाली. त्यापैकी तब्बल भाजपाने ७१६ ग्रामपंचायतीवर विजय मिळवला. महायुतीला १ हजार ३६९ ठिकाणी विजय मिळाला आहे. विजयाचा हा वारू असाच कायम ठेवण्यासाठी संघटनात्मक बांधणी आणखी मजबूत करावी. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने राज्यात 'महाविजय- २०२४' ही मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे बूथनिहाय यंत्रणा कामाला लागली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पूर्ण बहुमताने विजयी करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले, आगामी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही भाजपा नंबर- १ राहील, असा विश्वास आहे. भाजपा कार्यकर्ते आणि पदाधिकारी पक्षश्रेष्ठींच्या निर्देशाप्रमाणे संघटनात्मक कार्यात सक्रीय आहेत. तळागाळातील लोकांपर्यंत मोदी सरकारचे महत्त्वाकांक्षी निर्णय आणि कल्याणकारी योजना आम्ही पोहोचवण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. ग्रामपंचायत निवडणुकीत लोकांचा कल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बाजुने असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रभावी संघटन हेच भाजपाच्या यशाची गुरूकिल्ली आहे.



### पदाधिकारी संघटनात्मक कार्यात सक्रीय आहेत

» विजयाचा हा वारू असाच कायम ठेवण्यासाठी संघटनात्मक बांधणी आणखी मजबूत करावी. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने राज्यात 'महाविजय- २०२४' ही मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे बूथनिहाय यंत्रणा कामाला लागली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पूर्ण बहुमताने विजयी करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले, आगामी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही भाजपा नंबर- १ राहील, असा विश्वास आहे. भाजपा कार्यकर्ते आणि पदाधिकारी पक्षश्रेष्ठींच्या निर्देशाप्रमाणे संघटनात्मक कार्यात सक्रीय आहेत.

# सणासुदीच्या काळात अतिक्रमण कारवाई नको!

## उसनवारी, कर्ज काढून उत्सव काळात हंगामी व्यवसाय

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** जुनी सांगवी व परिसरात महापालिका अतिक्रमण विभागाकडून सण उत्सव काळात लागणाऱ्या वस्तू, पूजा साहित्य, फटाके स्टॉल आदींवर कारवाई करण्यात येत आहे. हे विक्रेते घर संसाराला हातभार लागावा म्हणून उसनवारी, कर्ज काढून उत्सव काळात हंगामी व्यवसाय करतात. बेरोजगारी व बेकारीवर एकीकडे शासन काम करत असताना हंगामी व्यावसायिकांवर अतिक्रमण कारवाई करून त्यांना आर्थिक भुर्दंडाची झळ सोसावी लागत असल्याने उत्सव काळात प्रशासनाकडून अशा कारवाया करू नयेत, अशी मागणी माजी नगरसेवक प्रशांत शितोळे यांनी केली आहे. 'ह' क्षेत्रीय कार्यालयामार्फत सांगवी, दापोडी परिसरात बुधवारी (ता. ८) अतिक्रमण विभागाच्या वतीने फुटपाथवरील फटाके स्टॉलवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई क्षेत्रीय अधिकारी उमेश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता सुषेन उगले, संदीप हजारे, ज्योती राजापुरे, कल्याणी वाघमारे व अतिक्रमण पथकाकडून करण्यात आली.



> ''वरिष्ठांच्या सूचनेनुसार रहदारीस अडथळा ठरणाऱ्या व्यावसायिक स्टॉल यांना सूचना देऊन कारवाई करण्यात आली. सुरक्षा व खबरदारी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.''
>
> – संदीप हजारे, निरिक्षक, अतिक्रमण विभाग 'ह' क्षेत्रीय कार्यालय

# ‘ससून’प्रकरणी कारवाई कुणावर?

## समितीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ससून रुग्णालयातील कैदी पलायनप्रकरणी चौकशीसाठी नेमलेल्या समितीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे अखेर बुधवारी पोहोचला. सरकारी कामकाजातील दिरंगाईमुळे समितीने अहवाल सादर केल्यानंतर तब्बल १३ दिवसांनी तो मंत्र्यांसमोर मांडण्यात आला. आता या अहवालावर काय कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे. ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती. या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. ही समिती १५ दिवसात चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीचे अध्यक्ष डॉ. म्हैसेकर यांनी १५ दिवस संपताच तातडीने २७ ऑक्टोबरला चौकशी अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांना सादर केला. हा अहवाल निवतकर यांच्याकडून वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिनेश वाघमारे यांच्याकडे पाठवला जाणार होता. वाघमारे हे परदेश दौऱ्यावर होते. ते परतल्यानंतर ३ नोव्हेंबरला हा अहवाल त्यांच्यासमोर सादर करण्यात आला. नंतर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ हे दौऱ्यावर होते. ते दौऱ्यावरून परतल्यानंतर त्यांच्याकडे अखेर बुधवारी अहवाल सादर करण्यात आला.




### चार जणांची चौकशी समिती

» ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती. या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. ही समिती १५ दिवसांत चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीचे अध्यक्ष डॉ. म्हैसेकर यांनी १५ दिवस संपताच तातडीने २७ ऑक्टोबरला चौकशी अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांना सादर केला.

**“ससूनच्या चौकशीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासमोर सादर करण्यात आला आहे. अहवाल गोपनीय असल्याने त्यातील तपशील जाहीर करता येणार नाही. अहवाल तपासून मंत्री त्यावर कार्यवाही करतील.**

**-दिनेश वाघमारे,**
**सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग**

११ ऑक्टोबर – वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांकडून चौकशी समिती नियुक्त

२७ ऑक्टोबर – चौकशी समितीकडून वैद्यकीय शिक्षण आयुक्तांकडे अहवाल

३ नोव्हेंबर – वैद्यकीय शिक्षण आयुक्तांकडून वैद्यकीय शिक्षण सचिवांकडे अहवाल

८ नोव्हेंबर – वैद्यकीय शिक्षण सचिवांकडून मंत्र्यांकडे अहवाल सादर

# महापालिका कामगारांची दिवाळी बोनसविना कडू

## महापालिका आणि ठेकेदारांकडून टोलवाटोलवी

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महापालिकेतील कंत्राटी कामगारांना दिवाळी बोनस मिळणार अशी घोषणा करण्यात आली. पण दिवाळी सुरु झाली तरीही त्यांच्या बँक खात्यात एक रुपयाही जमा झालेला नाही. महापालिका प्रशासन आणि ठेकेदारांनी एकमेकांकडे बोट दाखवत टोलवाटोलवी केल्याने तब्बल ९ हजार कर्मचाऱ्यांची ऐन दिवाळीत घोर निराशा झाली आहे. महापालिकेच्या विविध विभागांमध्ये सुमारे ९ हजार कर्मचारी काम करत आहेत. महापालिकेतील कायम कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी सारखेच काम करत असताना त्यांच्या पगारात मोठा फरक आहे. किमान दिवाळी तरी त्यांना बोनस मिळाला पाहिजे अशी मागणी कामगारांनी व संघटनांनी केली होती. यासाठी महापालिकेच्या प्रवेशद्वारावर कामगार संघटनांनी उपोषण सुरु केले होते. यासंदर्भात महापालिका आयुक्तांकडे कामगार संघटनांची बैठक झाली. तसेच कायद्याचा आधार घेऊन घेऊन ही जबाबदारी महापालिकेची नाही तर ठेकेदाराची आहे, त्याची अंमलबजावणी प्रशासनाने करून घेतली पाहिजे असे ठरले. तसेच यासंदर्भात कामगार सहाय्यक आयुक्त नि. अ. वाळके यांनी बोनस प्रदान




अधिनियमाच्या आधारे बोनस देण्यात यावा असे पत्र महापालिकेला पाठविले होते. त्यानंतर पुढील दोन तीन दिवसात ठेकेदाराकडून बोनसची रक्कम कामगारांच्या खात्यात जमा होईल असे सांगण्यात आले. त्यानंतर महापालिकेपुढे गुलाल उधळून जल्लोष करण्यात आला होता. हा निर्णय होऊन एक आठवडा झाला तरीही कामगारांच्या बँक खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. तसेच ठेकेदारांनी महापालिकेला पत्र लिहून बोनस देण्यास असमर्थता दर्शविली आहे. जर बोनस द्यायचा असेल तर महापालिकेने ती रक्कम आम्हाला द्यावी असे पत्रात नमूद करण्यात आले आहेत. ही पत्र महापालिकेचा कामगार विभाग, निविदा काढणाऱ्या संबंधित विभागांकडे देण्यात आले आहेत. कंत्राटी कामगारांना बोनस मिळावा यासाठी राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांनी उपोषण केले होते. पण सहाय्यक कामगार आयुक्तांनी महापालिकेला पत्र पाठविल्यानंतर शिंदे यांनी उपोषण मागे घेतले. त्यानंतर जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली होती. पण ठेकेदारांनी त्यास विरोध करत एकाही कर्मचाऱ्याला बोनस दिलेला नाही. असे असतानाही काँग्रेस भवनात राष्ट्रीय मजदूर संघाने आज (ता.९) बोनसचा निर्णय करायला भाग पाडले यानिमित्ताने सभा आयोजित करण्यात आली होती.

**“महापालिका कंत्राटी कामगारांना सुधारित दराप्रमाणे वेतन देते, त्यात बोनसची तरतूद नाही. पण ठेकेदारांनी कामगारांना बोनस देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. पण ठेकेदारांनी बोनस न देता त्यासाठीच्या पैशाची मागणी महापालिकेकडे केली आहे. बोनस हा ठेकेदारांनी दिला पाहिजे, महापालिका देणार नाही.’’**

**- नितीन केंजळे,**
**मुख्य कामगार अधिकारी, महापालिका**

# तर गृहखातं माझ्याकडे द्या!

## त्या' व्हिडीओप्रकरणी अंधारेंची फडणवीसांवर टीका

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुण्यातील पोलिसांच्या वॅनचा एक व्हिडीओ पोस्ट करून ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी गृहखात्याची झोप उडवली आहे. काही तरुण पोलिसांना काही पाकिटं देतात असं या व्हिडीओमध्ये दिसत आहे. यावरून राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा एकदा लक्ष्य केलं जातंय. लित पाटील प्रकरणामुळे गृहखातं टार्गेट झालेलं असताना आता पुन्हा एकदा या व्हिडीओमुळे गृहमंत्र्यांच्या कार्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. पुण्यात ज्या ठिकाणी हा प्रकार घडला त्याच ठिकाणी उभं राहून सुषमा अंधारे यांनी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, हा जेल परिसर आहे. इथून २०० मीटर अंतरावर जेल आहे. बाजूला जात पडताळणी केंद्र आहे. पुढे महिला सुधारगृह आहे. या संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही नाही. मुद्दा हा आहे की तुरुंगातील कैद्यांना भेटायला त्यांचे



साथीदार जाणार असतील, वाईट प्रवृत्तीचे लोक येथे वावरणार असतील, या रस्त्यावर अनुचित प्रकार घडला तर सीसीटीव्ही कुठे आहे? इथं का सीसीटीव्ही नाहीय? त्यामुळे येथे बस लावली गेली. जेणेकरून सामान्य नागरिकांना वाटेल की कैदी बाथरुमसाठी थांबले असतील. या व्हिडीओत दिसतंय त्याप्रमाणे गाडी येते आणि थांबते. टू व्हिलरवरून दोन लोक येतात, एक मुलगा खाली उतरतो. तिथून एक पोलीस अधिकारी उतरतो, त्या पोलीस अधिकाऱ्याशी तो मुलगा बोलते. मागे जातो, वॅनच्या मागच्या दरवाजाजवळ येतो. पण वॅनच्या आतला पोलीस दरवाजा उघडत नाही. तो पुढे पुन्हा जातो, त्यांच्यात काही देवघेव होते. मागचा पोलिसही दरवाजा उघडतो. पाकिटे,पिशव्या आत जातात. पाकिटे पिशव्या द्यायच्याच होत्या तर कारागृह प्रशासनाची परवानगी घेऊन द्यायच्या होत्या. इथं द्यायला कोणी परवानगी दिली? इथं का दिली गेली? ही छोटी पाकिटे होती, म्हणजे यात कैद्यांची कपडे तर नव्हते. मग एवढ्या छोट्या पाकिटातून काय दिलं, हे कळलं पाहिजे. जे कोणी अधिकारी आहेत, त्यांच्या फक्त चौकशा होऊन चालत नाही. कायद्याचे तीन तेरा वाजले जातात. अब्रुनुकसानीचे दावे ठोकणारे सरकारमधील सर्व मंत्री, आता गृह खात्यावर काही बोलणार आहेत का? तुमच्या अब्रुची लक्तरे संपूर्ण महाराष्ट्रात टांगलेली आहेत, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. ललित पाटील फरार होतो. ललित पाटील म्हणतो, मी पळून गेलो नाही, मला पळून लावलं. ज्यांनी पळवलं त्यापैकी एकजण सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसतो. त्याला सस्पेंड केलं जातं. लोकांच्या चौकशा झाल्या पाहिजेत. पुणे स्मार्ट सिटी आहे. मग इतक्या संवदेनशील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे का नाहीत. एखाद्या मायमाऊलीची छेड काढली गेली, चमकमक उडाली तर? मग सीसीटीव्ही का लावले नाहीत? याची चौकशी झाली पाहिजे, असंही सुषमा अंधारे म्हणाल्या. या प्रकरणातील अधिकाऱ्यांना ओळखा. त्यांना ओळखणं फार अवघड काम नाहीय. सगळं मीच करायचं असेल तर गृहखातं मलाच द्या. गृहमंत्री म्हणून फडणवीस अपयशी आहेत.

### इथं का सीसीटीव्ही नाहीय?

» ओबीसी विरुद्ध मराठा असे वाद लावत जा, अशीही टीका त्यांनी केली. इथून २०० मीटर अंतरावर जेल आहे. बाजूला जात पडताळणी केंद्र आहे. पुढे महिला सुधारगृह आहे. या संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही नाही. मुद्दा हा आहे की तुरुंगातील कैद्यांना भेटायला त्यांचे साथीदार जाणार असतील, वाईट प्रवृत्तीचे लोक येथे वावरणार असतील, या रस्त्यावर अनुचित प्रकार घडला तर सीसीटीव्ही कुठे आहे? इथं का सीसीटीव्ही नाहीय? त्यामुळे येथे बस लावली गेली. जेणेकरून सामान्य नागरिकांना वाटेल की कैदी बाथरुमसाठी थांबले असतील. या व्हिडीओत दिसतंय त्याप्रमाणे गाडी येते आणि थांबते. टू व्हिलरवरून दोन लोक येतात, एक मुलगा खाली उतरतो.

# जिल्ह्यातील धरणांमध्ये ८० टक्के पाणी शिल्लक!

## गेल्या वर्षीच्या तुलनेत पाणीसाठा २२.०१ टक्क्यांनी कमी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे जिल्ह्यातील २६ पैकी नाझरे हे धरण अद्यापही कोरडे ठणठणीत असून उर्वरित २५ धरणांमध्ये मिळून आजअखेर (ता.९) एकूण १५८.६६ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचे हे प्रमाण एकूण पाणीसाठ्याच्या तुलनेत ७९.९९ टक्के इतका आहे. गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेपर्यंतच्या शिल्लक पाणीसाठ्याच्या



तुलनेत यंदा मात्र उपलब्ध पाणीसाठा हा ४३.३७ टीएमसीने कमी आहे. गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला जिल्ह्यातील धरणांमध्ये एकूण २०२.०३ पाणीसाठा उपलब्ध होता. गेल्या वर्षीच्या या उपलब्ध पाणीसाठ्याचे प्रमाण हे १०२ टक्के इतके होते. त्यामुळे यंदाचा आजअखेरचा उपलब्ध पाणीसाठा हा गेल्या वर्षीच्या तुलनेत २२.०१ टक्क्यांनी कमी झाला आहे. या २६ धरणांव्यतिरिक्त टाटा समूहाच्या सहा धरणांमधील पाणीसाठा वेगळा आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ३२ धरणे आहेत. यापैकी सहा धरणे ही टाटा समूहाची आहेत. टाटा समूहाची धरणे वगळता उर्वरित २६ धरणे आहेत. पुणे जिल्ह्यातील धरणांमध्ये उजनी, भामा आसखेड, माणिकडोह, चासकमान, पवना, मुळशी, टेमघर, वरसगाव, पानशेत, गुंजवणी, नीरा देवधर, भाटघर, वीर आदी प्रमुख धरणांचा समावेश आहे. या सर्व धरणांतील मिळून एकूण प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा क्षमता ही १९८.३४ टीएमसी इतकी आहे. दरम्यान, पुणे शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमध्ये मिळून आजअखेरपर्यंत २६.५९ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. या चार धरणांमध्ये टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेपर्यंत या चार धरणांमध्ये एकूण २८.४७ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला होता. यानुसार गतवर्षीच्या तुलनेत यंदा खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमधील एकूण पाणीसाठा हा १.८८ टीएमसीने कमी असल्याचे स्पष्ट झाले आहे. जलसंपदा विभागाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या धरण साठा आकडेवारी अहवालातून हे उघड झाले आहे.